## जागतिक पुस्तक दिन

# 'ई-बुक्स'चा बोलबाला!

**मुंबई, ता. २२ :** छापील पुस्तकाचा आकार आता ॲप्लिकेशनच्या रूपात बदलतोय तो ई-बुकसारख्या पर्यायातून. अगदी वेबसाईट असो किंवा ॲप्लिकेशनवरून पुस्तक डाऊनलोड करायचे असो, पुस्तकांच्या पानांची संख्या आणि जाडी हा विषय आता राहिलेला नाही. पुस्तके ऑनलाइन मिळू लागल्यामुळे छोटी शहरे; तसेच खेड्यांतही आता पुस्तके पोचणे, या मर्यादा राहिलेल्या नाहीत.

पुस्तक वाचण्यासाठी मनपसंत आकार शक्य होतोय तो ई-बुकमुळे. ई-बुकच्या स्वरूपात पुस्तके हव्या त्या स्क्रीनवर उपलब्ध होऊ लागल्याने एकाचवेळी ती बाळगण्याची अडचणही दूर झाली आहे. वेबसाईट तसेच ॲप्लिकेशनमुळे अवघ्या काही टॅपवर पुस्तक डाऊनलोड करण्याचा पर्याय ग्राहकांना सोयीस्कररीत्या मिळतोय. अगदी एक रुपयापासून ते मोफत अशी दुर्मिळ पुस्तके सध्या न्यूजहंट, किंडल यांसारख्या ॲप्लिकेशनवर वाचण्यासाठी उपलब्ध आहेत. छापील पुस्तकाचे वजन नको, ऑफलाइन वाचण्याची सोय आणि गरजेनुसार ठळक अक्षरांत पुस्तक वाचण्याची सुविधा यामुळे ई-पुस्तकाचा ट्रेंड गॅजेटप्रेमींमध्ये पसंतीस उतरतोय. कॉम्प्युटरच्या स्क्रीनपासून टॅबलेट, मोबाईल ई-बुक्स असा प्रवास वाचकांत आता रुळला आहे.

लॅपटॉप, आयपॅड आणि टॅबलेटवर पुस्तक वाचणाऱ्यांसोबतच आता मोबाईलवरही ई-बुक्स वाचण्याचा छंद जोपासला जात आहे. ई-पुस्तके वाचणारे वाचक देशभरात वाढत आहेत. मराठीतही ई-बुक वाचणाऱ्यांची संख्या वाढत आहे, अशी माहिती 'बुकगंगा डॉट कॉम'च्या संचालिका सुप्रिया लिमये यांनी दिली. ई-बुकच्या माध्यमातून पायरसीचे प्रकार आटोक्यात आणण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्यामुळेच जी गोष्ट म्युझिक इंडस्ट्रीबाबत घडली तसा प्रकार ई-बुकसाठी घडायला नको, असा प्रयत्न असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.